महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ, अमरावती
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION
AMRAVATI DIVISIONAL BOARD, AMRAVATI 444602

पत्र क्र.अविमं./माप/ 2090
दिनांक- ३० /११/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषयः**- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ विद्यार्थ्यांची अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्वीकारण्याच्या तारखांबाबत.

**संदर्भः**- क्र. रा.मं. / परीक्षा-८/४६०७, दिनांक २८/११/२०२४.

उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषगांने आपणास कळविण्यात येते की, फेब्रुवारी – मार्च २०२५ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्वीकारण्याची मुदत दिनांक ३०/११/२०२४ रोजी संपुष्टात येणार आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर १) श्रेणी / तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसांचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु. ५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, २) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसांपर्यंत प्रती विद्यार्थी प्रतिदिन रु. १००/- विशेष अतिविलंब शुल्क तदनंतरच्या १५ दिवसांकरिता व परीक्षेच्या अगोदरच्या दिवसापर्यंत म्हणजेच दिनांक २०/०२/२०२५ पर्यंत रु. २००/- प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्वीकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

लेखी परीक्षा दि. २१/०२/२०२५ रोजी सुरु झाल्यानंतर कोणत्याही नियमित, पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार, खाजगी विद्यार्थी, तुरळक व आय.टी.आय. विषय घेणा-या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारल्या जाणार नाहीत, यांची नोंद घ्यावी.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु.१००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) | अतिविशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत ( रु. २००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे ) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा | रविवार दिनांक ०१/१२/२०२४ ते शनिवार दिनांक ०४/०१/२०२५ | रविवार दिनांक ०५/०१/२०२५ ते रविवार दिनांक १९/०१/२०२५ | सोमवार दिनांक २०/०१/२०२५ ते गुरुवार दिनांक २०/०२/२०२५ |

सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. आवेदनपत्र ऑनलाईन भरलेल्या विद्यार्थ्यांचे अतिविलंब / विशेष अतिविलंब / अतिविशेष अतिविलंब शुल्क ऑनलाईन चलन तयार करुन चलनावर नमूद ICICI बँकेच्या Virtul Account मध्ये कोणत्याही बँकेव्दारे त्याच दिवशी ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात यावे. रक्कम जमा केल्यानंतर त्या चलनामधील सर्व विद्यार्थ्यांच्या Application status मध्ये Send to board व Payment status मध्ये Paid असा बदल झाला आहे का याची खातरजमा करावी. असे status प्राप्त झालेली आवेदनपत्रेच ग्राहय धरण्यात येतील.शाळांनी चलन उशिरा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत विलंबाची फी शाळेला आकारण्यात येईल. आवेदनपत्रा सोबत पत्रासोबत जोडलेल्या परिशिष्ट – अ विहीत प्रपत्रांसह सादर करण्यात यावे.

अतिविलंब शुल्क, विशेष अतिविलंब शुल्क, अतिविशेष अतिविलंब शुल्क यांद्वारे आवेदनपत्र भरलेल्या विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल तसेच त्यांचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होऊ शकला नाही तर विद्याथी त्यास हरकत घेऊ शकणार नाही. असे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून शाळांनी घ्यावे.

मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**महत्वाची सूचनाः - आवेदनपत्रामध्ये नाव/जन्मतारीख/विषय/माध्यम याबाबत Prelist च्या दुरुस्त्या राहिलेल्या असल्यास ऑनलाईन पध्दतीने दिनांक १० डिसेंबर २०२४ पूर्ण करण्यात याव्यात, याची नोंद घेण्यात यावी.**

(निलिमा टाके)
विभागीय सचिव,
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

प्रत माहितीस्तवः-

१. मा. सचिव,म. रा. माध्य. व उ. माध्य. शि. मंडळ, भांबुर्डा, शिवाजी नगर, पुणे-०४
२. शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती.
३. शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. अकोला, अमरावती,बुलडाणा,यवतमाळ व वाशिम

# परिशिष्ट–अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ----------------------------------------

विभागीय मंडळाचे नावः ------------ विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ----------------------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१) विद्यार्थ्यांचे नाव : ----------------------------------------------------------

२) शाळेचे नाव व पत्ता : ------------------------------------------------------

३) शाळेचा सांकेतांक क्रमांक : ------------------------------------------------

४) विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार      ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती      ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५) उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. ------------------------- २. ---------------------------

३. ------------------------- ४. ---------------------------

५. ------------------------------------------------------------

६) शाळा प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का

७) अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ---------

क) दंड कशाप्रकारे भरला – रोख/ चलन क्रमांक ------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस -------------------------------------

-------------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का